# प्रेस नोट

दिनांक ०८/०६/२०२६ ते २२/०६/२०२६ या कालावधीत मुंबई शहरामध्ये राबविण्यात येणा-या **''ऑपरेशन शोध ४''** ही शोध मोहिम रेकॉर्डवरील अपनयन/ अपहरण झालेल्या १८ वर्षाखालील मुले व मुली (बालके) व हरविलेल्या १८ वर्षावरील महिलांबाबत विशेष शोध मोहिमे दरम्यान नागरिकांनी मदत करण्यासंदर्भात प्रेस नोट

..............................................................................................................

मुंबई शहरामधील रेकॉर्डवरील अपनयन/ अपहरण झालेल्या १८ वर्षाखालील मुले व मुली (बालके) व हरविलेल्या १८ वर्षावरील महिलांबाबत विशेष शोध मोहिमे करण्यासाठी दिनांक ०८/०६/२०२६ ते २२/०६/२०२६ या कालावधीत मुंबई शहरामध्ये **''ऑपरेशन शोध ४''** हया शोध मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर कालावधीमध्ये मुंबई शहरातुन १८ वर्षाखालील हरविलेलेली जास्तीत जास्त मुले व मुली व १८ वर्षावरील हरविलेल्या महिला मिळुन येण्यासाठी पोलीस ठाणे स्तरावर जास्तीत जास्त प्रयत्न करण्यात येणार आहे. सदर मोहिम यशस्वी होण्यासाठी मुंबई मधील नागरिकांनी पोलीस/बालकांसंदर्भात काम करणाऱ्या विविध अशासकीय संस्था यांना मदत केल्यास जास्तीत जास्त हरविलेल्या/अपहरण झालेल्या बालकांचा शोध घेण्यास मदत होणार आहे. तरी मुंबईमधील सर्व नागरिकांना विनंती करण्यात येते की त्यांनी आपल्या परिसरामध्ये संशयास्पद लहान मुले व मुली मिळुन आल्यास अगर त्यांच्याबाबत काही माहिती मिळाल्यास खालीलप्रमाणे माहिती संबंधीत विभागांना देवून सदरचा उपक्रम चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी मुंबई पोलीसांना मदत करावी.

- कोणताही संशयीत लहान मुले व मुली मिळुन आल्यास त्यांच्याकडे चौकशी करावी व काही संशयीत वाटल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १०० अगर १०९८ या क्रमांकावर कळवावे किंवा लगतच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा अगर सदर बालकास तात्काळ जवळच्या पोलीस ठाणेस घेवून जावे.
- दि.०८/०६/२०२६ ते २२/०६/२०२६ या कालावधीत रेल्वे स्थानके, बसस्थानके, रस्त्यावर भिक मागणारी अथवा कचरा गोळा करणारी लहान मुले/मुली, धार्मिक स्थळे, रूग्णालये, हॉटेल्स, दुकाने इत्यादी ठिकाणी काम करणारी लहान मुले/मुली मिळून आल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १०० या क्रमांकावर कळवावे अगर लगतच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.
- आपण रहात असलेल्या परिसरामध्ये लहान मुले/मुली काम करीत असल्याचे मिळून आल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १०० किंवा १०९८ या क्रमांकावर कळवावे अगर लगतच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.
- रेल्वे स्टेशन बाहेरील परिसर/बस स्थानका बाहेरील परिसर या ठिकाणी बेवारस स्थितीत लहान मुले/मुली मिळुन असल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १०० किंवा १०९८ या क्रमांकावर कळवावे अगर लगतच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.
- आपल्या राहत्या परिसरात नातेवाईकांकडे राहणारी लहान मुले व मुली यांचेबाबत काही संशय असल्यास त्याबाबत तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १०० किंवा १०९८ या क्रमांकावर कळवावे अगर लगतच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.
- एखादा अल्पवयीन मुलगा किंवा मुलगी संशयीत वाटल्यास त्याबाबत **https://missionvatsalya.wcd.gov.in** या बेवसाईटवर जावुन khoya paaya या पोर्टलवर मुला व मुलीचा फोटो अपलोड करावा.
- आपल्या आजुबाजुच्या परिसरामध्ये कोणी लहान मुले घरकाम करताना मिळुन आल्यास त्याबाबत तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १०० अगर १०९८ या क्रमांकावर कळवावे किंवा लगतच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.